आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१८ जून २०२५ - बुधवार

**ठळक बातम्या**

- राज्य शिक्षण मंडळाच्या मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये हिंदी अनिवार्य ऐवजी वैकल्पिक करण्याचा राज्य सरकारचा निर्णय, राजकीय पक्षांकडून निर्णयाला विरोध

- आषाढी वारीसाठी संत तुकाराम महाराजांच्या पालखीचं देहूमधून प्रस्थान

- राष्ट्रीय महामार्गांवरच्या टोलसाठी १५ ऑगस्टपासून ३ हजार रुपयांत पास मिळणार

**आणि**

- कवी सुरेश सावंत आणि कादंबरीकार प्रदीप कोकरे यांना साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर

<><><><><>

राज्य शिक्षण मंडळाच्या मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना हिंदी भाषा ही तृतीय भाषा म्हणून अनिवार्य नाही, असं राज्य सरकारनं स्पष्ट केलं आहे. यासंदर्भात सरकारने शुद्धीपत्रक जारी केलं. आता विद्यार्थ्यांना हिंदी ऐवजी इतर भारतीय भाषा निवडण्याचा पर्याय असून, किमान २० विद्यार्थी इच्छुक असतील तर शिक्षक नियुक्ती किंवा ऑनलाईन शिक्षणाची व्यवस्था करता येईल, असं या पत्रकात म्हटलं आहे. राज्यातल्या सर्व शाळांमध्ये मराठी भाषा अनिवार्य असल्याचंही यात स्पष्ट केलं आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले…

**होल्ड - मुख्यमंत्री बाइट**

विविध राजकीय पक्षांनी या निर्णयाला विरोध केला आहे. काल जारी केलेल्या शासन आदेशात शब्दछल करून हिंदी सक्ती ठेवली आहे. केवळ शब्द बदलल्यानं त्याचा आशय बदलत नाही, असं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

हिंदी ही राष्ट्रभाषा नाही, तर काही राज्यांची भाषा आहे. काही सनदी अधिकाऱ्यांच्या दबावामुळे हिंदी भाषेच्या सक्तीचा घाट घातला जात असल्याचा आरोप मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी केला. या निर्णयाला विरोध करण्याचं आवाहन त्यांनी शाळांच्या मुख्याध्यापकांना पत्र लिहून केलं आहे.

**<><><><><>**

आषाढी वारीसाठी जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचा ३४० वा प्रस्थान सोहळा आज देहू इथं उत्साहानं संपन्न झाला. तुकाराम महाराजांच्या पादुकांचं पूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते झालं. भागवत धर्म आणि वारकरी संप्रदायाने शेकडो वर्ष आक्रमणातून आपल्या देवतेचं संस्कृतीतून रक्षण केलं आहे. असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी पालखी प्रस्थान सोहळ्यासाठी सकाळपासूनच  दाखल झाले होते. टाळ मृदुंगाच्या साथीनं, तुकोबारायांच्या नामगजरात, उत्साहानं पालखी पंढरपूरच्या दिशेनं रवाना झाली. या सोहळ्यात सुमारे ५०० दिंड्या सहभागी झाल्या आहेत. संत ज्ञानेश्वरांची पालखी उद्या आळंदीहून प्रस्थान ठेवेल.

**<><><><><>**

महाराष्ट्राची संतपरंपरा जपण्याचं काम संत तुकाराम महाराज संतपीठात होणार आहे. या ठिकाणी संपूर्ण संतसाहित्य सीबीएसई अभ्यासक्रमाच्या माध्यमातून चार भाषांमध्ये शिकविलं जाणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. पुण्याजवळ चिखली इथल्या जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठाच्या कलादालन आणि सभागृहाचं लोकार्पण आज त्यांच्या हस्ते झालं तेव्हां ते बोलत होते. संतपीठानं तयार केलेल्या संकल्प आराखड्यानुसार पंढरपूर आणि आळंदी इथं उभारण्यात येणाऱ्या संतपीठाला महाराष्ट्र शासन पूर्णपणे मदत करेल असं आश्वासन त्यांनी दिलं.

<><><><><>

आदिवासी विकासासाठी राखीव असलेला निधी आदिवासी विकास योजनांसाठीच वापरला जावा, आदिवासींसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ आदिवासींनाच व्हावा, बोगस आदिवासी प्रमाणपत्र धारकांवर कडक कारवाई करावी, तसंच पेसा भागांच्या विकासावर विशेष लक्ष देण्यासंदर्भात आपण आग्रही असून, न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिनस्त राहून पेसा भागात आदिवासी कर्मचाऱ्यांची पदभर्ती करण्यासंदर्भात आपण मुख्यमंत्र्यांशी चर्चा करू, असं आश्वासन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी दिलं आहे. अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या नेतृत्वाखाली एका शिष्टमंडळानं आज मुंबईत राजभवनात राज्यपालांची भेट घेऊन आदिवासी समाजाच्या विविध प्रश्नांवर चर्चा केली, त्यावेळी ते बोलत होते.

राज्यपाल हे राज्यातल्या आदिवासी भागांचे पालक असल्यानं त्यांनी विधिमंडळाच्या प्रत्येक अधिवेशनाच्या वेळी आदिवासी लोकप्रतिनिधी आणि

सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींची बैठक घ्यावी अशी विनंती झिरवाळ यांनी यावेळी केली.

<><><><><>

इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत वसतिगृहांसाठी ज्या जिल्ह्यांमध्ये अद्याप भाडेतत्त्वावर जागा निश्चित झालेली नाही, तिथं तातडीनं योग्य जागा निश्चित करण्याचे निर्देश इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी दिले आहेत. या विभागाच्या १५० दिवसांच्या आराखड्याच्या अनुषंगानं मुंबईत आयोजित बैठकीत ते बालत होते.

२६ जिल्ह्यांमधे १०० विद्यार्थी क्षमतेची मुला-मुलींसाठीची ५६ वसतीगृहं सुरु केली आहेत. या वसतीगृहांना भेटी देऊन सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध आहेत याची खात्री करावी, असे निर्देश त्यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

<><><><><>

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना महिला नागरी सहकारी पतसंस्था स्थापन करता येईल, अशी माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिली आहे. शासनाच्या ८ मार्च २०१९ रोजी परिपत्रकानुसार निकष पूर्ण करणाऱ्या संस्थांची नोंदणी प्रक्रिया केली जाईल, असंही ते यावेळी म्हणाले.

<><><><><>

महामार्गांवरचा प्रवास स्वस्त, सुलभ करण्याच्या उद्देशानं येत्या १५ ऑगस्टपासून वार्षिक फास्टॅग पास सुरू करायचा निर्णय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयानं घेतला आहे. तीन हजार रुपये किंमतीचा हा पास एका

वर्षाच्या कालावधीसाठी किंवा २०० फेऱ्यांसाठी लागू असेल. राष्ट्रीय महामार्गावर व्यक्तिगत वापराच्या वाहनांना हा पास वापरता येईल, अशी माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली.

**बाइट- नितीन गडकरी**

पास काढण्यासाठीची लिंक लवकरच राजमार्ग यात्रा ॲप आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, तसंच रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या अधिकृत संकेतस्थळांवर उपलब्ध होईल.

**<><><><><>**

साहित्य अकादमीनं वार्षिक बाल साहित्य आणि युवा पुरस्कारांची घोषणा आज केली. मराठी भाषेसाठी सुरेश सावंत यांच्या ‘आभाळमाया’ या कवितासंग्रहाला बाल साहित्य पुरस्कार मिळाला आहे. तर युवा पुरस्कार प्रदिप कोकरे यांच्या ‘खोल खोल दुष्काळ डोळे’ या कादंबरीला मिळाला आहे. स्मृतीचिन्ह आणि ५० हजार रुपये रोख असं या पुरस्कारांचं स्वरुप आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुरस्कार विजेत्यांचं अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी त्यांच्या अध्यक्ष आणि संचालक पदाच्या अपात्रतेला आव्हान देणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर पीठाकडे दाखल केली आहे. नाशिक इथं झालेल्या आंदोलनादरम्यान सरकारी कामकाजात अडथळा आणल्याच्या आरोपावरून एमपी-एमएलए विशेष न्यायालयानं कडू यांना एक वर्षाची शिक्षा सुनावली होती. या शिक्षेमुळे तत्कालीन विभागीय सहनिबंधकांनी त्यांना या

पदांसाठी अपात्र ठरवलं होतं. या शिक्षेला मुंबई उच्च न्यायालयाच्या, न्यायमूर्ती शिवकुमार दिघे यांच्या एकलपीठानं, ११ मार्च २०२५रोजी निलंबित केलं होतं. याच मुद्द्याच्या आधारे कडू यांनी आपली याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर उद्या सुनावणी होणार आहे.

<><><><>

रायगड जिल्ह्यात श्रीवर्धन इथले शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे माजी आमदार तुकाराम सुर्वे यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी त्यांचं पक्षात स्वागत केलं.

<><><><>

राज्यात गेल्या २४ तासात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडला. कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी, तर मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात, कोकणात बहुतांश ठिकाणी मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात काही ठिकाणी, तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. पुढच्या २४ तासांसाठी पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांना, तसंच पुणे घाट, सातारा घाट या भागांना हवामान विभागानं ऑरेंज अलर्ट दिला आहे.

//<><><><>//